नि.फौ.ख.क्र.६४/२०२२

शासन वि. रामदास

नि.क्र. २२

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यात येते.**

**सदर साक्षीदाराचा पुरावा दृक श्राव्य माध्यमाद्वारे Google Meet चा वापर करुन जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथून सहभागी झालेल्या साक्षीदाराच्या आभासी उपस्थितीत नोंदविला आहे. पुरावा नोंदणी सुरु करतेवेळी आवाज वा दृश्याबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण नव्हती.**

नावः मिरा अनील मटाले,

वयः ३० वर्ष, धंदाः पो.उ.नि,

पत्ताः पुरवीकांचन पो. स्टे. पुणे ग्रामीण

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.व्ही.तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

**१.** दि. २३/०८/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, नागपूर येथे पो. उ. निरीक्षक म्हणून कार्यरत होती.

**तांत्रिक अडचणी कारणास्तव सरतपास पुढीलतारखेपर्यंत तहकूब**

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष**

(**जी.ओ. वानखडे**) (**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः ०७/१०/२०२५

**नि.फौ.ख.क्र.६४/२०२२**

**शासन वि. रामदास**

**नि.क्र. २२**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची साक्ष व्ही. सी. द्वारे नोंदविण्यात येते.**

**सदर साक्षीदाराचा पुरावा दृक श्राव्य माध्यमाद्वारे Google Meet चा वापर करुन दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, सासवड, पुणे येथून सहभागी झालेल्या साक्षीदाराच्या आभासी उपस्थितीत नोंदविला आहे. पुरावा नोंदणी सुरु करतेवेळी आवाज वा दृश्याबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण नाही.**

**२.** दि. २३/०८/२०२२ रोजी अशी माहिती मिळाली की, रामोजी काकडे हा त्याच्या लॉजवर स्वतःच्या फायद्याकरिता महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेतो. सदर लॉज हा इटगाव फाटा, खापरखेडा रोडवर होता. या माहितीवरुन बोगस ग्राहकास तीन रु. ५००/– च्या नोटा दिल्या. नोटाच्या नंबरचा पंचासमक्ष पंचनामा करुन घेतला. बोगस ग्राहकास काकडे बार रेस्टॉरेंट येथे पाठविले. बोगस ग्राहकाने आम्हाला ठरल्यानुसार मोबाईलवर मिस कॉल दिला. त्यानंतर ०२.०० वाजताच्या सुमारात पंचासह आम्ही काकडे बार रेस्टॉरेंट येथे गेलो. काऊंटरवर बसलेल्या ईसमास नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव रामु गुंडेराव काकडे असे सांगितले. त्यास बोगस ग्राहकाची विचारणी केली असता काऊंटर पासून तिसऱ्या क्रमांकाच्या खोलीत गेल्याचे सांगितले. त्यानंतर रामु काकडे यास दोन पोलिसांच्या ताब्यात दिले. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकाच्या खोलीत गेलो. तेथे एक मुलगी अर्ध नग्न अवस्थेत मिळून आली. त्या मुलीला कपडे घालायला सांगितले व तिचे नाव विचारले असता तिने तिचे नाव रिया राजा कोल असे सांगितले. त्या मुलीने तिचे वय १८ वर्षे सांगितले. राहणार जबलपूर मध्यप्रदेश असे सांगितले. बाजूच्या खोलीत आम्हाला सहा मुली मिळून आल्या. त्या मुलींचे नाव अर्चना महेश अहीरवार रा. जबलपूर म.प्र., अंजली अमर गोठीया रा. जबलपूर, बबीता नंदकुमार भंडारी रा. नागपूर, आशु अरुण रा. नागपूर, पुजा हिम्मतराव इंगळे रा. लातूर, सुरेखा नाग पुजारी रा. लातूर असे होते. सदर मुलींना महिला कर्मचाऱ्याच्या ताब्यात दिले. आम्ही तेथे पाहणी केली असता

काकडे बार रेस्टॉरेंटच्या आतमध्ये बाजूने बसण्याची जागा आहे. हॉटेलमध्ये तीन खोल्या आहेत. काऊंटरच्या समोर एक खोली होती. त्याच खोलीत सहा मुली बसलेल्या मिळून आल्या. त्याच खोलीची पाहणी केली असता त्यामध्ये एक बाथरुम व एक बेड दिसून आला. काऊंटरच्या समोर असलेल्या पाच खोलींपैकी पहिल्या खोलीची पाहणी केली असता ती खोली १० X १५ लांबीची होती. त्यामध्ये एक लाकडी बेड, ड्रेसींग टेबल, कुलर दिसून आले. त्याखोलीमध्ये डस्टबीनमध्ये वापरलेला निरोध जरुर कंपनीचा दिसून आला. बाथरुमच्या वर असलेल्या रॅक मध्ये जरुर कंपनीच्या निरोधचे पॅकेट मिळून आले.

३. दुसऱ्या खोलीची पाहणी केली असता, ती खोली १० X १५ लांबीची होती. त्यामध्ये एक बेड, ड्रेसींग टेबल, कुलर दिसून आला. बाथरुच्या बाजूने असलेल्या डस्बीमध्ये वापरलेला निरोध जरुर कंपनीचा दिसून आला. बाथरुच्या बाजूने असलेल्या रॅकमध्ये तीन निरोध जरुर कंपनीचे पॅकेट मिळून आले. दोन्ही खोलीत मिळून आलेला मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आले.

४. तिस–या खोलीची पाहणी केली असता, ती खोली १० X १५ लांबीची होती. त्यामध्ये पीडित मुलगी रिया मिळून आली. त्या खोलीमध्ये एक बेड, ड्रेसींग टेबल, कुलर हा चालू स्थितीत दिसून आला. बाथरुच्या बाजूला असलेल्या डस्टबीनमध्ये वापरलेला निरोध जरुर कंपनीचा दिसून आला. बेडवर काळपट रंगाची बेडशीट दिसून आली त्यावर पॅराशूट कंपनीची तेलाची बॉटल अंदाजे २५ एम. एल. क्षमतेची व जरुर कंपनीचा निरोध मिळून आला. सर्व मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला.

५. चौथ्या खोलीची पाहणी केली असता, ती खोली १० X १५ लांबीची होती. त्या खोलीमध्ये एक बेड, ड्रेसींग टेबल, कुलर दिसून आला.

६. पाचव्या खोलीची पाहणी केली असता, ती खोली १० X १५ लांबीची होती. त्या खोलीमध्ये एक बेड, ड्रेसींग टेबल, कुलर दिसून आला इतर खोल्यांप्रमाणे त्या

खोलीमध्ये त्याचप्रमाणे व्यवस्था केली होती.

७. आरोपीकडे चौकशी केली असता त्याने बोगस ग्राहकाकडून घेतलेल्या नोटा काढून दिल्या. त्या नोटांचे क्रमांक मी आज सांगू शकणार नाही. पूर्वी केलेल्या पंचनाम्यासोबत सदर नोटा जुळवून पाहिल्या असता तीनही नोटा जुळलेल्या मिळून आल्या. काऊंटरची पाहणी केली असता झंडू बामच्या दोन बॉटल, आयोडेक्सची डब्बी, व्ही वॉशची बॉटल, जरुर कंपनीचा निरोधचा मोठा बॉक्स त्यामध्ये १४२ निरोध मिळून आले व काही औषधी मिळून आल्या. सर्व वस्तु पंचासमक्ष जप्ती केल्या. काऊंटरच्या बाजूच्या उत्तर दिशेला जळालेल्या जरुर कंपनीचा निरोधचा बॉक्स मिळून आला. तसेच दोन कंडोमचे पॅकेट मिळून आले त्याचे कंपनीचे नाव सांगता येणार नाही. काऊंटरच्या मागच्या बाजूने एक कॅलेंडर होते त्यावर इंटरनॅशनल जनानी लिहीले होते. त्यावर पुष्ठ लावले होते व लिहिले होते की पैसे पहिले द्या तसेच फक्त २० मिनीट असे लिहिले होते. काऊंटरवर काही रजिस्टर मिळून आले. एका रजिस्टर मध्ये हिशेब लिहीला होता व एका रजिस्टर मध्ये काही मुलींचे नाव लिहिले होते व नावासमोर ग्राहकाचे आकडे लिहीले होते.

**मध्यान्ह वेळ झाल्याकारणास्तव सरतपास तहकूब**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.10.28 16:44:53 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE Date: 2025.10.28 16:45:00 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः २८/१०/२०२५

**मध्यान्हानंतर साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास  व्ही. सी. द्वारे**

**दृक श्राव्य माध्यमाद्वारे Google Meet चा वापर करुन दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, सासवड, पुणे येथून सहभागी झालेल्या साक्षीदाराच्या आभासी उपस्थितीत नोंदविण्यात येत आहे. पुरावा नोंदणी सुरु करतेवेळी आवाज वा दृश्याबाबत कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण नाही.**

८.  काऊंटरवर एक पे.टी.एम. मशीन, नगदी रक्कम रु.६६००/– त्यामध्ये रु.५००/– च्या १० नोटा व रु. १००/– च्या १६ नोटा मिळून आल्या. आरोपीने सदर रक्कम ग्राहकांनी दिले असलयाचे सांगितले. बेड शिट, पे.टी.एम. मशीन व रक्कम पंचासमक्ष जप्त केली. आरोपीची अंगझडती घेतली असता दोन मोबाइल मिळून आले. त्यामध्ये एक रेड मी नोट व एक व्ही. वो. कंपनीचा मोबाईल होता. सदर मोबाईल जप्त करण्यात आले. तसेच आरोपीची मारुती वॅगन आर कार क्र. एम. एच. ४० ए. आर. ५००८ जप्त करण्यात आली.  आरोपीविरुद्ध फिर्याद नोंदविली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही त्यातील मजकूर खरा आहे त्यास **नि. क्र. २३** देण्यात येते. आता मला एफ.आय.आर दाखविण्यात आली त्यावर माझी सही त्यातील मजकूर खरा आहे त्यास **नि. क्र. २४** देण्यात येते. मी सातही पीडितांचे बयान नोंदविले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकते. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सहायक सरकारी विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.28 16:45:10 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.10.28 16:51:13 +0530

(**जी.ओ. वानखडे**)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः  २८/१०/२०२५